फौजदारी किरकोळ अर्ज नं. ४२१/२०२२ मधील
निशाणी क्र.०१ खालील आदेश.

दिलीप शंकर पवार वि. महाराष्ट्र राज्य.

अर्जदार यांनी सदरचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ अंतर्गत कलम ४५१, ४५७ पिशोर पोलिस ठाणे यांनी गु.र.नं. ३५६/२०२२ कलम ३७९ भा.दं.वी. मध्ये जप्त केलेले ट्रॅक्टर परत मिळणेकरीता दाखल केला आहे ज्याचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

अ.- रजिस्ट्रेशन नं. - MH-20-EE-4740, Swaraj 744 Company,
चेसीस नं. – WYCK45922951157
इंजिन नं. – 433009SWK18361

२. अर्जदार यांचे असे म्हणणे आहे की, अर्जदार हे मौजे चिंचोली लिं., ता. कन्नड, जि. औरंगाबाद येथील रहिवासी आहे. अर्जदाराच्या मालकीचे ट्रॅक्टर क्र. MH-20-EE-4740 स्वराज ७४४ असा असुन मॉडल २०१७ हे पिशोर पोलीस स्टेशन यांनी गु.र.क्र.३५६/२०२२ कलम ३७९ भा.दं.वी. मध्ये जप्त करण्यात आलेले आहे. सदरचे वाहन जप्त झाल्यामुळे अर्जदार यांचे अतोनात नुकसान होत आहे. सदरचे वाहन पोलिस स्टेशनमध्ये पडून राहील्यास नैसर्गिक आपत्तीपासून नुकसान होणार आहे. त्यामुळे सदरचे वाहन बॉण्डवर परत मिळावे अशी विनंती अर्जदार यांनी केली आहे. अर्जदार यांनी खालीलप्रमाणे कागदपत्रे दाखल केली आहेत –

| अ.क्र. | तपशील | निशाणी |
|---|---|---|
| १. | एफ.आय.आर.ची प्रत | ३/१ |
| २. | वाहन क्र. MH-20-EE-4740 ची आर.सी. बुक ची प्रत. | ३/२ |
| ३. | अर्जदार यांचे आधारकार्डची साक्षांकित पडताळलेली प्रत. | ३/३ |

३. तपासीक अंमलदार यांनी निशाणी ५ येथे आपले म्हणणे सादर करुन असे कळविले आहे की, सदर गुन्हयातील वाहन सोडले तर तो पुन्हा त्यामध्ये मुरुमचे बेकायदेशीर वाहतुक करेल तसेच ज्या ज्या वेळी तपास कामी वाहनाची गरज पडेल

त्या त्या वेळेस हजर करणार नाही तसेच निकाल लागे पर्यंत गुन्हयातील जप्त वाहन कोणालाही विकेल किंवा गहान ठेवील याची शाश्वती नाही तरी अर्जदार याने मागणी केलेला मुद्देमाल परत करण्यास हरकत असल्याचे कथन केले आहे.

४. सहाय्यक सरकारी अभियोक्ता आर.अं.पाटील यांनी सदर अर्जास आपले म्हणणे दाखल करुन सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे. त्यांचे असे कथन आहे की, सदरील गुन्हयाचा तपास चालु असुन, जप्त मुद्देमाल सोडल्यास ती विक्री होण्याची किंवा त्यात बद्दल होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे गुन्हयाचे गांर्भीय लक्षात घेता, प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्यात यावा.

५. प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी व तसेच इतर आरोपींचे म्हणणेही मागवण्यात आले होते. गु.र.नं.३५६/२०२२ चे प्रथम खबर अहवाल पाहीले असता असे लक्षात येते की, फिर्यादी पोलीस अधिकारीच आहे. त्यांचे म्हणणे नि.५ वर आले आहे. या प्रकरणातील इतर आरोपी म्हणजेच दत्तु मोरे, कृष्णा पवार, ज्ञानेश्वर बोटकर, संदिप पवार, अनिल कडुबा मोरे सुर्यभान पवार व समाधान देवरे यांनी फौजदारी किरकोळ अर्ज क्र.४३६/२०२२, ४२२/२०२२, ४३७/२०२२ व ४३२/२०२२ यामध्ये जप्त करण्यात आलेले वाहनं मिळण्यासाठी अशा प्रकारचेच अर्ज दाखल केले आहे. त्यामुळे त्यांच्या म्हणण्याविना प्रस्तुत प्रकरण पुढे चालवण्यात येत आहे. अर्जदारतर्फे विधीज्ञ, सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद ऐकला.

६. तपासीक अंमलदार यांच्या म्हणण्यावरुन स्पष्ट होते की, सदरचे वाहन हे गु.र.नं.३५६/२०२२ मध्ये जप्त करण्यात आलेले आहे. जप्त वाहनाच्या मालकीबाबत अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन जसे की, जप्त वाहना बाबत अर्जदाराने नोंदणी प्रमाणपत्र त्यातुन असे लक्षात येत आहे की, जप्त वाहन हे अर्जदाराच्या मालकीचेच आहे. तसेच त्याबाबत कोणताही वाद नाही. तसेच सदर वाहनासाठी इतर कोणीही मागणी केली नाही.

७. मा. सर्वोच्च न्यायालय यांनी ***Sundharbhai Ambalal Desai V/s. State of Gujarat (Supra) reported in 2003 All MR (Cri.) 363 (SC)*** या न्यायनिवाडयात मुद्देमाल परतीबाबत

आदेश करताना प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांना मार्गदर्शक सुचना घालुन दिलेल्या आहेत. या मार्गदर्शक सुचनाप्रमाणे कोणताही मुद्देमाल १५ दिवस ते १ महिन्यापेक्षा जास्त कालावधीकरीता पोलिस स्टेशनमध्ये पडुन राहता कामा नये त्याबाबत प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांनी योग्य ते आदेश केले पाहिजेत असे निर्देश दिले आहेत.

८. सदरचे वाहन पोलिस स्टेशनमध्ये जास्त दिवस पडून राहीलेस ऊन, वारा व पाऊस यामुळे जप्त वाहनचे नुकसान होवू शकते. अर्जदार यांच्या मालकीबाबत तपासीक अंमलदार यांनी शहानिशा केली असुन ते अर्जदाराच्या मालकीचेच असल्याचे त्यांनी म्हटले आहे. जप्त वाहन हे खटल्या दरम्यान पुरावा करीता किंवा इतर काही कारणांकरीता आवश्यक असल्यास तशी व्यवस्था करता येईल. सहाय्यक सरकारी वकील व तपासी अंमलदार यांनी जप्त वाहन हे अर्जदारास परत केल्यास, ते पुन्हा अशाप्रकारचा गुन्हा करण्यासाठी वापरण्यात येवू शकते अशी शंका उपस्थित केली आहे. परंतू, सदर शंका ही कोणत्याही ठोस आधारे मांडली नाही. त्यामुळे, फक्त या शंकेच्या आधारे किंवा त्यावर विसंबून सदर अर्ज नामंजूर करण्यास योग्य नाही. अशा परिस्थितीत मा. सर्वोच्च न्यायालयाचे मार्गदर्शक तत्वे लक्षात घेऊन व सदर केसची एकुण परिस्थीती पाहता काही अटींवर अर्जदार यांना जप्त वाहन परत देणे न्यायोचीत होणार आहे म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. पिशोर पोलिस ठाणे, गु.र.नं. ३५६/२०२२ यामध्ये जप्त केलेले ट्रॅक्टर ज्याचे वर्णन खालील प्रमाणे आहे – रजिस्ट्रेशन नं. -MH-20-EE-4740, Swaraj 744 Company, चेसीस नं. –WYCK45922951157, इंजिन नं.–433009SWK18361, एकुण अंदाजे किमंत रु. १०,००,०००/–(रक्कम रुपये दहा लाख फक्त) चा सुपूर्दगीनामा अर्जदार **दिलीप शंकर पवार** यांनी न्यायालयात करुन देणेच्या अटींवर व खालील अटींवर परत देण्यात यावा.

अ) अर्जदार यांनी सदरचे वाहनाचा रंग अथवा बाह्य व अंतरीक स्वरुपात तसेच त्याचे महत्वाचे भाग या गुन्हयांचा निकाल होईपावेतो कोणताही

बदल करणेचा नाही. अर्जदाराने सदरचे वाहन निकाल होईपर्यत पुरेपुर देखभाल करावी.

ब) अर्जदार यांनी आवश्यकता असेल तेंव्हा सदरचे जप्त वाहन न्यायालयात अथवा संबंधीत पोलिस स्टेशनमध्ये हजर करावे.

क) अर्जदार यांनी सदर गुन्ह्याचा निकालापावेतो जप्त वाहन कोणत्याही प्रकारे कोणासही विकु नये, तबदील करु नये तसेच त्याच्यावर कोणताही बोजा निर्माण करु नये.

ड) अर्जदार यांनी सदरच्या जप्त वाहनाचा वापर या गुन्ह्याचा निकालापावेतो इतर कोणत्याही गुन्ह्यात करणेचा नाही.

३) तपासीक अंमलदार यांनी सदर जप्त वाहन अर्जदार यांच्या ताब्यात देताना त्याचा रितसर पंचनामा करुन सदरचे जप्त वाहन सत्वर अर्जदार यांचे ताबेत द्यावे व तसा अहवाल या न्यायालयास सादर करावा याबाबतचे सुचनापत्र तपासीक अंमलदार यांना पाठविण्यात यावे. अर्जदाराने जप्त केलेल्या वाहनाचे दोन रंगीत फोटो (विविध कोनातून) तपासिक अंमलदारांना उपलब्ध करुन दयावे. सदर फोटो पंचनाम्यामध्ये सामिल करावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Vijaya Narayanrao Katkar
Date: 2022.10.21 17:28:45 +0530

**ठिकाण – कन्नड.** **(काटकर विजया एन. एस.)**

**दिनांक २१/१०/२०२२** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कन्नड.**

## <u>प्रमाणपत्र</u>

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ.निकालपत्र/आदेश यामधील सर्व मजकुर मुळ निकालपत्र/आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – | के.जी.खैरे, |
| न्यायालयाचे नांव | – | (**काटकर विजया एन. एस.**),२रे सह दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर), तथा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कन्नड. |
| श्रुतलेखन दिल्याचा दिनांक | – | २१.१०.२०२२. |
| न्यायिक अधिका–यांनी निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक | – | २१.१०.२०२२. |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | – | २१.१०.२०२२. |

............................................................................................................